दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -१६४ मंगळवार,दि.१८ फेब्रुवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-164 | Tuesday, Dt.18 February 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# स्व.संतोष देशमुख प्रकरणात भडकवण्याचे काम करू नका

## धनंजय देशमुखांची बावनकुळेंवर नाराजी

मुंबई / प्रतिनिधी

भाजप आमदार सुरेश धस आणि धनंजय मुंडे भेटीवरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर गंभीर आरोप केला होता. सुरेश धस यांनी देशमुख कुंटुबीयांच्या अश्रुचा बाजार केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात भाजपचा हात आहे का? हे पहावे लागेल, असे ते म्हणाले होते. त्यावर संजय राऊतांचे वक्तव्य हा शुद्ध वेडेपणा आहे, अशा शब्दांत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार केला आहे. तसेच राऊतांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणात भडकवण्याचे काम करू नये, असा टोला देखील लगावला.

काय म्हणाले होते संजय राऊत?

सुरेश धस यांनी आंदोलन उभे करून देशमुख कुटुंबीयांच्या अश्रूंचा बाजार केला. धसांना आधीच थांबवायला हवे होते, पण भाजपने त्यांना बोंबाबोंब करू दिली. आका आणि आकाचे आका हे शब्द भाजपनेच आणले. मनोज जरांगेंच्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी धसांना पुढे आणले. यासाठी त्यांनी संतोष देशमुख यांच्या खूनाचा वापर केला, असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला. या खून प्रकरणात भाजपचा हात आहे का? ते पहावे लागेल, असे संजय राऊत यांनी म्हटले होते.



### धनंजय देशमुखांची बावनकुळेंवर नाराजी

दरम्यान, सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्यातील भेट चंद्रशेखर बावनकुळे यांनी घडवून आणल्याचे बोलले जात आहे. यावरून संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांना सुरेश धस आणि धनंजय मुंडे आंची भेट घडवण्यात जेवढा इंटरेस्ट होता, तेवढे गांभीर्य संतोष देशमुखांच्या घरी भेट घेण्याबद्दल का दाखवले नाही, असा सवाल धनंजय देशमुख यांनी केला. चंद्रशेखर बावनकुळे यांना महत्वाची कामे सोडून समेट करणे महत्त्वाचे वाटले.


### संजय राऊतांनी भडकवण्याचे काम करू नये

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, संजय राऊतांचे वक्तव्य म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. संतोष देशमुखाच्या मारेकरीला फाशी व्हावी म्हणून चौकशी सुरू आहे. त्यामुळे त्यांनी भडकवण्याचे काम करू नये. देशमुख हत्या ही गंभीर बाब आहे. याकडे राजकारण म्हणून बघू नये, आरोपीला फाशी झाली पाहिजे. यासाठी सरकारच्या चौकशीला सगळ्यांनी साथ द्यावी, असे आवाहन देखील चंद्रशेखर बावनकुळेंनी केले आहे. तसेच सुरेश धस संदर्भात वारंवार प्रश्न विचारून राजकारण करू नका, असेही ते म्हणाले.

## देशातील प्रार्थनास्थळ कायद्याशी संबंधित ७ याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलली

प्रतिनिधी । नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने आज (१७ फेब्रुवारी) प्रार्थनास्थळ कायद्याशी संबंधित ७ याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलली. या प्रकरणाची सुनावणी दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर होणार होती. सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, आज फक्त २ न्यायमूर्तींचे खंडपीठ बसले आहे. या प्रकरणाकडे आपण दुसऱ्या दिवशी पाहू.या प्रकरणावर दाखल करण्यात आलेल्या हस्तक्षेप अर्जांवर सरन्यायाधीश म्हणाले की, आज आम्ही अशी कोणतीही याचिका स्वीकारणार नाही. यालाही मर्यादा आहेत. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.



असदुद्दीन ओवेसी यांच्या याचिकेचा समावेश

आज सर्वोच्च न्यायालयाला -खचखच् प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांच्या याचिकेवरही सुनावणी करावी लागली. त्यांची याचिका सहा आधीच प्रलंबित याचिकांसह एकत्रित करण्यात आली आहे. याचिकेत ओवेसी यांनी १९९१ चा प्रार्थनास्थळ कायदा लागू करण्याची मागणी केली आहे. कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी अस्तित्वात आलेल्या कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळाचे अन्य कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळात रूपांतर करता येणार नाही.

इतर सर्व न्यायालयांनी त्यांचे हात थांबवणे योग्य होईल

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने १२ डिसेंबर २०२४ रोजी प्रार्थनास्थळे कायदा (विशेष तरतुदी) १९९१ च्या ६ कलमांच्या वैधतेवर दाखल केलेल्या याचिकांवर अंतिम सुनावणी केली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, इतर सर्व न्यायालयांनी त्यांचे हात थांबवणे योग्य

(उर्वरीत पान २ वर)

# सेलगांव नजिक पांगरी रस्त्यालगत बंद सुर्या हॉटेलच्या मागे पत्याचा जुगार अड्डा चालतोय खुलेआम



जालना /प्रतिनिधी

जगण्याची भ्रांत हरविणारा आणि देशोधडीला लावणारा पत्याचा जुगार अड्डा बदनापूर पोलीस ठाणे हद्दीतील सेलगांव नजिक पांगरी रस्त्यालगत बंद सुर्या हॉटेलच्या मागे पत्याचा जुगार अड्डा राजरोसपणे खुलेआम सुरू बाहेर गावाहून लोक या जुगार खेळण्यासाठी येत असतात दुपारी दोन वाजल्या पासून ते रात्री नऊ वाजेपर्यंत खचाखच भरलेला हा जुगारचा अड्डा गेल्या काही दिवसांपासून पत्याचा डाव अगदी बिनदिक्कतपणे सुरू आहे. सेलगांव ते नजिक पांगरी रस्त्यावरील बंद सुर्या हॉटेल च्या पाठी मागे हा जुगाराचा अड्डा आहे तो काही साधासुधा नाही त्या ठिकाणी सुरू असलेली उलाढाल पाहिल्यास कोणाचेही डोळे दिपतील या पत्याच्या अड्ड्यावर दररोज होते १ कोटी रुपया लगतची उलाढाल. सात ते आठ जणांची टोळी चालवते हा जुगाराचा अड्डा पत्याचा जुगार खुलेआम सुरू आहे.या राजरोसपणे सुरु असलेल्या पत्याचा जुगार अड्याचा पोलिसांना हप्ता मिळतो की काय अशी शंका निर्माण झाली असून बाहेर गावाचं जुगारी मोठे व्यापारीही येतात जुगार खेळायला बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुलेआम पत्याचा जुगार अड्डा अगदी बिनदिक्कतपणे हा एवढ्या मोठ्या जुगार अड्ड्याला थारा देणाऱ्यावर कारवाई होणार का ? सेलगांव नजिक पांगरी रस्त्यावरील बंद सुर्या हॉटेल च्या पाठीमागे खुलेआम सुरू असलेल्या पत्याचा जुगाराकडे जालना जिल्हयाचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल याकडे लक्ष देणार का ? असा सवाल सामान्य जनतेतून होत आहे

## शेतकऱ्यांच्या मावेजापोटी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त




### माजलगाव न्यायालयाची पहिली ऐतिहासिक कारवाई !

बीड /प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथील शेतकर्यांची जमीन तलावात गेलेल्या जमिनीचा संपूर्ण मावेजा १० वर्षानंतरही दिला नाही. यामुळे माजलगाव न्यायालयाच्या आदेशाने थेट जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले होते. या आदेशावरून सोमवारी (दि.१७) जिल्हाधिकार्यांची गाडी जप्त करून माजलगाव न्यायालयात जमा केल्याने खळबळ उडाली आहे.

वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथील शेतकरी शिवाजी टोगे, संतोष टोगे व बाबू मुंडे या शेतकर्यांची जमीन लघु सिंचन तलावासाठी शासनाने संपादित केली होती. या जमिनीचा अत्यंत तुटपुंजा मावेजा त्यांना देण्यात आला होता. त्यामुळे या शेतकर्यांनी माजलगाव येथील सत्र न्यायालयात धाव घेत यासाठी दावा दाखल केला होता.या दाव्यावर न्यायालयाने संबंधित शेतकर्यांचे म्हणणे अंशतः मान्य करून ऑक्टोबर २०१५ मध्ये या शेतकर्यांना वाढीव मावेजा द्यावा असा निकाल दिला होता. मात्र शासनाने

(उर्वरीत पान २ वर)

# सार्वजनिक शिवजयंती उत्सवात सहभागी व्हा

## आ.संदीप क्षीरसागरांचे बीडकरांना आवाहन



बीड (प्रतिनिधी):- दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यासाठी आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी होणार आहे. शिवजयंती सोहळ्यास सर्व बीडकर बंधू-भगिनिंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनातून भव्य दिव्य आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी केली जात आहे. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि क्रीडा कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी होत आली आहे. दरवर्षी प्रमाणे बीडच्या सांस्कृतिक परंपरेनुसार सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शासकीय महापूजा आणि सायंकाळी ६:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा.श्री.सत्येंद्र पाटील, उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार व श्री.विष्णू वाघमारे, सचिव श्री.दिपक कर्नावट, कोषाध्यक्ष श्री.शिवाजी सानप, सहकोषाध्यक्ष सी.ए.श्री.संतोष आमटे व श्री.अशोक ठाकरे, प्रसिद्धी प्रमुख दिलीप खिस्ती तसेच सदस्य डॉ.प्रशांत गायकवाड, प्रा.कॅप्टन जगन्नाथ चव्हाण, श्री.अंकुश निर्मळ, श्री.प्रकाश वक्ते, प्रा.डॉ.रेखा ढेरे, डॉ.पुजा जाधव, श्री.सुमंत खांडे या सर्व समिती सदस्यांच्या चोख नियोजनाखाली यावर्षीची शिवजयंती ऐतिहासिक होणार आहे. तरी सर्व बीडकरांनी या शिवजयंती उत्सव सोहळ्यात सहभागी होऊन भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

ही आहेत सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे

-तब्बल ४५० ढोलताशांचे 'करवीर नाद' नावाचे सुप्रसिद्ध असलेल्या ढोलताशा पथकाचे सादरीकरण

- 'तिबेटियन माँक' अर्थात तिबेट देशातील धर्मगुरूंचे जगप्रसिद्ध असलेले 'शाओलीन मार्शल आर्ट'

-पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाचे पथक ऍक्रोबाईक्स आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर करणार.

- ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथक आपली कला सादर करणार.

-आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाईट आणि लेजर शो.

महिला, वृध्द आणि बालकांसाठी असणार विशेष बैठक व्यवस्था

दरम्यान या कार्यक्रमामध्ये महिला, लहान मुले आणि वृद्धांसाठी विशेष बैठक व्यवस्था असणार आहे. जेणेकरून महिला भगिनींनाही कार्यक्रमाचा आनंद घेता यावा. तसेच कार्यक्रमस्थळी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचेही समितीकडून सांगण्यात आले आहे.

# वडवणी नगरपंचायत मध्ये वस्ताद लहूजी साळवे यांची पूण्यतिथी साजरी

वडवणी /प्रतिनिधी

क्रांतीगुरू लहुजी राघोजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ तर मृत्यू १७ फेब्रुवारी १८८१ मध्ये झाला.लहूजी वस्ताद हे भारतीय क्रांतिकारक होते. काहीवेळा त्यांचा उल्लेख लहुजी वस्ताद नावाने देखील केला जातो. सविस्तर वृत्त असे की,आज दि १७-०२-२०२५ रोजी वडवणी नगरपंचायत मध्ये लहूजी वस्ताद साळवे यांची पूण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी नगराध्यक्ष शेषेराव जगताप, नगरसेवक नागेश डीगे, पत्रकार अविनाश मुजमुले, सचिन पाटोळे,करण सरवदे, अनिल मुजमुले,व शाम राठोड मामा यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.



लहुजींचा जन्म पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या नारायणपूर गावच्या नारायण पेठेमधील पूर्वीच्या मांगवाड्यातील एका हिंदू मांग कुटुंबात झाला.लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील पुरुषांकडून मिळाले होते.त्यांचे वडील राघोजी साळवे देखील लढवय्ये होते.दांड पट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी या सर्व युद्धकलेमध्ये लहुजी तरबेज होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक' निर्माण करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्यासाठी इ.स. १८२२ मध्ये रास्ता पेठ, पुणे येथे तालीम युद्ध कलाकौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले.या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा

(उर्वरीत पान २ वर)



## पीएम श्री जि.प प्रशाला शहागड येथे डॉ. गजानन अवचार यांचे व्याख्यान

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील शहागड जि.प. प्रशाला येथे पीएम श्री योजने अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावरचे व्याख्याते प्रा.डॉ.गजानन अवचार उपप्राचार्य संत रामदास महाविद्यालय घनसावंगी यांचे भविष्यवेधी शिक्षणपध्दती व आजचा विद्यार्थी या विषयावर सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेत व्याख्यान आयोजित केले होते.

आजची शिक्षण पध्दती ही मुलांचा भविष्याचा विचार करून बणविण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पुर्ण कल्पकतेला वाव मिळणारे शिक्षण अवगत करावे. जेणे करुन भविष्यकाळात येणाऱ्या आव्हानांना सहज पेलता येईल. असे डॉ.अवचार यांनी यावेळी सांगीतले

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक वाहुळे सी.आर हे होते. तर प्रमुख पाहुने शालेय व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष अशफाक शेख, उपाध्यक्ष भगवान मानेसह सदस्य प्रशालेतील शिक्षक कांबडे,जोशी मॅडम,सोलनकर, वाघमारे,दरगुडे,शिंदे उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


## संपादकीय

# असत्याचे परिमार्जन

निवडणुकीच्या प्रचारात दिलेली आश्वासने ही पूर्ण करण्यासाठी नसतात, याची विविध पक्षांच्या नेत्यांनी आजवर कबुली दिलेली आहे. प्रत्येक नागरिकाला १५ लाख रुपये मिळतील, या आश्वासनावर 'वो तो चुनावी जुमला था' इथपासून ते, निवडणुकीपूर्वी वीज नसलेल्या गावात खांब आणून टाकायचे व मतदान झाले की पुन्हा परत घेऊन जायचे, याची कबुलीही काही थोर नेत्यांनी दिली आहे.

निवडणुकीच्या प्रचारात दिलेली आश्वासने ही पूर्ण करण्यासाठी नसतात, याची विविध पक्षांच्या नेत्यांनी आजवर कबुली दिलेली आहे. प्रत्येक नागरिकाला १५ लाख रुपये मिळतील, या आश्वासनावर 'वो तो चुनावी जुमला था' इथपासून ते, निवडणुकीपूर्वी वीज नसलेल्या गावात खांब आणून टाकायचे व मतदान झाले की पुन्हा परत घेऊन जायचे, याची कबुलीही काही थोर नेत्यांनी दिली आहे. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठी जाहिरातबाजी केलेल्या, राज्यातील अनेक मोफत योजनांना आता कात्री लावण्याचा विचार महाराष्ट्र सरकार करत आहे. त्याचा पूर्वार्ध म्हणून सरकारी खर्चांवरही ३० टक्के मर्यादा आणण्याचा आदेश वित्त विभागाने जारी केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मांडलेल्या राज्याच्या २४-२५च्या अर्थसंकल्पात घोषणांचा वर्षाव करण्यात आला होता. त्यातील 'लाडकी बहीण' योजना तर निवडणुकीत अशी फळली की तब्बल २३७ आमदारांचे पाठबळ मिळून महायुती सत्तेवर आली. मात्र आता पुढच्या महिन्यात सन २५-२६ या आर्थिक वर्षासाठी मांडण्यात येणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू असताना राज्याची आर्थिक परिस्थिती खूपच हलाखीची झाल्याचे सरकारच्या लक्षात आले आहे. गेल्या वेळी अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात प्रस्तावित राजकोषीय तूट एक लाख १० हजार कोटी रुपयांची होती. मात्र अनेक सनदी अधिकाऱ्यांनी ही तूट त्यापेक्षा किती तरी अधिक असल्याने ज्या मोफत योजनांचा धडाका अर्थसंकल्पात लावला आहे, तो लावू नका, असा सल्ला दिला होता. मात्र दोन पक्ष फोडल्याचा राग जनतेने लोकसभा निवडणुकीत काढल्याने सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर जादू करून दाखवायची होती. त्यामुळेच मग ४६ हजार कोटींची 'लाडकी बहीण', १४,५०० कोटी रुपयांची 'बळीराजा' अशा असंख्य योजनांची जंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात वाचून दाखवली. जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या दरम्यान 'लाडकी बहीण' योजनेवर सरकारने २५ हजार कोटी रुपये खर्च केले . हा खर्च थांबलेला नाही. दुसरीकडे पुणे रिंग रोड, मुलुंड-गोरेगाव लिंक रोड अशा जवळपास एक लाख कोटींच्या प्रकल्पांसाठीचे कर्ज, त्याला सरकारने दिलेली हमी आदी गोष्टींचा बोजा डोक्यावर आहेच.

या परिस्थितीत राज्य प्रगतिपथावर न्यायचे असल्यास राज्याच्या सकल घरगुती उत्पन्नात वाढ करावी लागेल. त्यासाठी गुंतवणूक करून संपत्तीचे निर्माण करावे लागेल. त्यातून मग महसूल वाढेल. सोबत रोजगारही वाढेल.

# हे डीपीआयच्या लढ्याला मिळालेले यश - अजिंक्य चांदणे

बीड /प्रतिनिधी

देशाची राजधानी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे. त्या साहित्य संमेलनाच्या महत्वाच्या स्थळाला साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात येणार आहे. तसे पत्र अखिल भारतीय साहित्य मंडळाकडून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाला देण्यात आले आहे. अशी माहिती डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बीड शहरातील हॉटेल निलकमल येथे सोमवार (दि.१७) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अजिंक्य चांदणे बोलत होते. या पत्रकार परिषदेला उत्तम पवार, बाप्पा सोनवणे, सुभाष लोणके, नवनाथ कांबळे, विजय चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की, दिल्लीत येत्या दि.२१,२२, २३ या कालावधीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असून स्वागताध्यक्ष म्हणून शरदचंद्र पवार असणार आहेत. अजिंक्य चांदणे असंही म्हणाले की, मराठी साहित्यात आण्णाभाऊ साठे यांचे नाव अग्रगण्य असेच आहे. त्यांची फकिरा कादंबरी जगातील २७ भाषांमध्ये भाषांतरीत झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची साहित्य संमेलनात दखल घेतली जावी, यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून राज्यातील बीड,सातारा, कोल्हापूर, सांगली, वाशीम, लातूर, जालना, छत्रपती संभाजी नगर,बुलढाणा आशा विविध जिल्ह्यात या विषयाच्या




अनुषंगाने आंदोलने झाली.संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत साहित्य मंडळ पुणे यांना लेखी निवेदने देण्यात आली होती. या चळवळीला व आंदोलनांना योग्य प्रतिसाद देत साहित्य मंडळाने आमच्या आंदोलनाची व मागणीची दखल घेत, पक्षाच्या नावाने पत्र जाहीर करून अण्णाभाऊंचा यथोचित सन्मान केला जाईल असे कळवले आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद घेऊन आम्ही साहित्य मंडळ पुणे व संमेलनाचे स्वागत अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे आभार व्यक्त करत आहोत.तसेच हा लढा यशस्वी करणाऱ्या सर्व अण्णाभाऊ साठे अनुयायांचे, पक्ष पदाधिकाऱ्यांचेही आम्ही आभार व्यक्त करत आहोत.असे अजिंक्य चांदणे म्हणाले.

आण्णा साहित्याची खान...

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य,१३ कथा संग्रह, १० पोवाडे, ७ चित्रपट कथा, १ प्रवास वर्णन असा मराठीचा खजिना तयार केला. आण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी जगातल्या २७ भाषांमध्ये भाषांतरीत आहे.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्यात अतिशय मोठे स्थान आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वाटेगाव या जन्मगावी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविले जावे. या मागणीसाठी आपण साहित्य मंडळाकडे मागणी करणार आहोत. असे स्पष्टीकरण डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिले.

# वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी शहर भावसार समाज युवा कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये वडवणी शहर भावसार समाज युवा अध्यक्ष म्हणून निखिल प्रवीण सरवदे, कार्याध्यक्ष रंजीत भास्करराव लांडे, उपाध्यक्ष धीरज राजेंद्र गार्डी तर सचिव पदी गणेश अशोकराव सदरे यांची एक मताने निवड करण्यात आली निवडीनंतर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

बीड जिल्हा भावसार समाज अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या सूचनेवरून बीड जिल्ह्यामध्ये भावसार समाज तालुका निहाय युवा कार्यकारणी स्थापन करण्यात येत आहे. त्यानुसार वडवणी भावसार समाजाच्या युवकांची नुकतीच अध्यक्ष महेश सदरे यांच्या अध्यक्षते खाली तर उपाध्यक्ष




**अध्यक्षपदी निखिल सरवदे, कार्याध्यक्ष रंजीत लांडे, उपाध्यक्ष धिरज गार्डी तर सचिव पदी गणेश सदरे यांची निवड**

विक्रम गार्डी ,मंगेश गार्डी भगवान पतंगे,सचिन गार्डी, राधाकिसन लांडे, प्रकाश पतंगे, सुधाकर तेरकर ,राजेंद्र गार्डी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये हिंगलाज माता मंदिर वडवणी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये वडवणी शहर युवा भावसार कार्यकारिणी अध्यक्ष म्हणून निखिल सरवदे कार्याध्यक्ष रंजीत लांडे,उपाध्यक्ष धिरज गार्डी सचिव म्हणून गणेश सदरे तर कोषाध्यक्ष निखिल दिगंबर पतंगे ,सहसचिव सुरज सुभाष गार्डी तर उर्वरित कार्यकारिणी मध्ये वैभव संतोष पतंगे ,अनिकेत भारत सरवदे ,राज आसाराम पतंगे, अजित रमेशराव गार्डी,अभिषेक वेंकट लांडे, आर्यन नितीन गार्डी ,साहिल भगवान पतंगे ,करण भाऊसाहेब गर्जे ,प्रथमेश विठ्ठल गार्डी, संचित सुभाष गार्डी, आदित्य सुधाकर लांडे यांची निवड करण्यात आली. दरम्यान या निवडीनंतर नवनिर्वाचित कार्यकारिणीचा बीड जिल्हा कार्यकारणीच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, उपाध्यक्ष गोपाळराव कंकाळ, सचिव अनिल राव सूत्रे, कोषाध्यक्ष कल्याणराव पतंगे, प्रदीपराव भावसार, प्रभाकरराव हजारे,कैलासराव रंगदळ ,मेत्रजकर, दत्ता पाखरे तर वडवणी भावसार समाजाच्या वतीने अध्यक्ष महेश सदरे उपाध्यक्ष विक्रम गार्डी यांच्या हस्ते शाल,

## जाहीर नोटिस

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी अपील नंबर १६६ / २०१४**
**राजेंद्र वि. सत्यशिला व ईतर**
**उत्तरवादीस अपीलच्या सुनावणी साठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बीड न्यायालयाच्या वि.वि.दा.क. २६/२०१० दिनांक १४/१०/२०१४ रोजीच्या हुकुमनाम्यावर / आदेशावर अपील**
**उत्तरवादी :**

5) Harishchadra S/o Umaji Gabhud, Age- Major, Occu- Agriculture, R/o Sanjay Nagar, Georai, Tq. Georai, Dist. Beed.

तुम्हास नोटीस देण्यात येते की, या प्रकरणातील नि.दि.दा.क. २६/२०१० च्या हुकुमनाम्यावर / आदेशावर अपीलकार याने अपील दाखल केले असून ते या न्यायालयात नोंदविण्यात आलेले आहे. तसेच सदर अपीलाच्या सुनावणीसाठी १९/०३/२०२५ ही तारीख न्यायालयाने निश्चित केलेली आहे. तुमच्या तर्फे तुम्ही स्वतः किंवा तुमचे वकील किंवा तुमचे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत सदरील अपीलाची सुनावणी होउन निकाल देण्यात येईल. सोबत अपीलप्रत जोडली आहे. आज दिनांक १३/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय,बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. :- ३७०/२०२४**
**अर्जदार - सुशिला भ्र. तुळशीराम घुबडे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम शेती, रा. पांगरबावडी, तेलगाव रोड, बीड ता. जि. बीड.**
**:: विरुध्द ::**
**गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, बीड**
**अर्जदारातर्फे वकिल :- ॲड. बी.बी. पिंपळे, बीड.**

मागणी -अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार सुशिला भ्र. तुळशीराम घुबडे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम शेती, रा. पांगरबावडी, तेलगाव रोड, बीड ता. जि.बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा नामे विष्णु पिता तुळशीराम घुबडे, वय १६ वर्षे हा अज्ञान असुन अर्जदार ही त्याची अज्ञान पालनकर्ती आई आहे. अज्ञान अर्जदार याचे नावे मौजे बीड तरफ खोड ता. जि. बीड येथिल शेत जमीन सर्व्हे क्र. २०/ई मधिल क्षेत्र ०० हे. २४ आर हि मिळकत असुन सदर मिळकती पैकी बिक्री करावयाचे क्षेत्र ०.०६ आर विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल,

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७ / १२ / २०२४ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख : २९/०३/२०२५

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय,बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८६ / २०२५**
**ॲड. ए. सी. पाटोदकर यांचे मार्फत**
**कल्याण व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी सुरेखा कल्याण मोरे, हया दिनांक १८.१०.२०२४ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत

त्याअर्थी,

१. कल्याण पि. प्रल्हाद मोरे, वय- ७५ वर्षे, धंदा-व्यापार रा. लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड

२. आनंद पि. प्रल्हाद मोरे, वय- ३९ वर्षे, धंदा-व्यापार रा. लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड

३. अमृता भ्र. अवधुत पंडीत, वय - ३३ वर्षे, धंदा- घरकाम रा. लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड

४. सोनाली भ्र. राजु वाघमारे, वय- ३२ वर्षे धंदा- घरकाम रा. अंकुश नगर, जालना रोड, बीड

अर्जदार क्र. १ हे मयत यांचे पती असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. ३ व ४ या विवाहीत मुली आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २१.०३.२०२५ ही आहे.

आज दिनांक १३.०२.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,बीड**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व.स्तर,बीड**

## जाहीर प्रगटन

**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

श्री. झेड. झेड. खान, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क. १०१/२०२५

कमल व इतर विरुद्ध निरंक

ज्यापेक्षा नागे जिवन पिता निवृत्ती शिंदे रा. गिल्ला ता. अंबाजोगाई जि. बीड दि.२६ /०९ / २०२२ रोजी मयत झाले आहेत.

अर्जदार :-

०१. कमल जिवन शिंदे, वय ७४ वर्ष, धंदा घरकाम रा. गिल्ला ता.अंबाजोगाई जि.बीड

०२. बालीका भ्र. आबासाहेब रनेर, वय ४५ वर्षे, धंदा. घरकाम रा. बागळगांव ता. पाथरी जि. परभरणी

०३. सुचिता भ्र. सुनिल भोसले, वय ४० वर्ष, धंदा घरकाम रा. खड्कपुरा अंबाजोगाई ता अंबाजोगाई जि.बीड

विरुध्द

गैरअर्जदार :- कोणीही नाही

ज्यापेक्षा नामे जिवन पिता निवृत्ती शिंदे रा. गित्ता ता. अंबाजोगाई जि.बीड हे दि.०२/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत नामे जिवन पिता निवृत्ती शिंदे यांचे वारसांना शासकीय निमशासकिय कार्यालयीन कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात हा अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी हया न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर न्यायालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्यल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यांत येईल.

पूढील तारीख- २७/०३/२०२५

आज दिनांक १२/०२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,अंबाजोगाई**

## जाहीरनामा

**मा. श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २१०/२०२५**
**शारदा वि.कोणीही नाही**
**विधीज्ञ ॲड. जरगि पी. एन.**
**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**
**अर्जदारः**

१) शारदा भ्र. संतराम देवडकर, वय- ४७ वर्षे, धंदा घरकाम, राहणार- नाथापुर, ता. जि. बीड २) आदिनाथ पि. संतराम देवडकर, वय - ३० वर्षे, धंदा- शेती, राहणार- वरील प्रमाणे ३) पवन पि. संतराम देवडकर, वय २५ वर्षे, धंदा- शेती, राहणार- वरील प्रमाणे ४) दिपक पि. संतराम देवडकर, वय २२ वर्षे, धंदा- शिक्षण, राहणार- वरील प्रमाणे ५) सोमित्राबाई भ्र. अण्णा देवडकर, वय ७७ वर्षे, धंदा- शिक्षण, राहणार- वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे संतराम पि. अण्णा देवडकर हे राहणार बीड ता. जि. बीड हे दिनांक १९/१०/२०२४ रोजी नाथापूर, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयत नामे संतराम पि. अण्णा देवडकर यांची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे.

मयत नामे संतराम पि. अण्णा देवडकर यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत संतराम पि. अण्णा देवडकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १७/०३/२०२५ आहे.

आज दिनांक ०३/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व.स्तर,बीड**

## पान १ वरून...

**देशातील प्रार्थनास्थळ ...**

होईल. १२ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या ३ सदस्यीय खंडपीठाने प्रार्थनास्थळ कायदा (विशेष तरतुदी) १९९१ च्या काही कलमांच्या वैधतेवर दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी केली.

खंडपीठाने म्हटले होते की, 'आम्ही या कायद्याची व्याप्ती, त्याचे अधिकार आणि रचना तपासत आहोत. अशा स्थितीत इतर सर्व न्यायालयांनी हात रोखणे योग्य ठरेल. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, आमच्यासमोर दोन प्रकरणे आहेत, मथुराची शाही ईदगाह आणि वाराणसीची ज्ञानवापी मशीद. त्यानंतर देशात अशी १८ हून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. यापैकी १० मशिदींशी संबंधित आहेत. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला ४ आठवड्यांच्या आत याचिकांवर आपली भूमिका मांडण्यास सांगितले.

**शेतकऱ्यांच्या मावेजापोटी ....**

काही प्रमाणात रक्कम देऊन संपूर्ण रक्कम देण्यास चालढकल केली. त्यामुळे माजलगाव न्यायालयाचे सह. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. पी. बुधवंत यांनी सदर रकमेला व्याज लावून सदर रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दहा दिवसापूर्वी पारित केले होते.

त्यानुसार कोर्टाने वादी यांचे वकील यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी यांना मावेजा बाबत सोमवारी आपली बाजू मांडली व रक्कम अदा करणे बाबत सांगितले; परंतु जिल्हाधिकारी यांनी

## पान १ वरून...


पैशाची पूर्तता करू शकत नाही तुम्ही गाडी घेऊन जा, असे सांगितल्याने कोर्टाच्या बेलीपने जिल्हाधिकारी यांची गाडी क्रमांक एम एच २३ बीसी २४०१ ही गाडी कायदेशीर बाबीची पूर्तता करून जप्त करून माजलगाव न्यायालयात जमा केली आहे. शेतकर्यांच्या वतीने ऍड बाबुराव तिडके, एस.एस.मुंडे यांनी बाजू मांडली.

**वडवणी नगरपंचायत ..**

फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहादूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यात शिकले.आशा या महान क्रांतीकारकाला वडवणी नगरपंचायतच्या अभिवादन करण्यात आले.

वस्ताद लहूजी साळवेंचा आदर्श युवकांनी घ्यावा- नगराध्यक्ष शेषेराव जगताप

वस्ताद लहुजी साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले परंतु त्या निमित्ताने आताच्या युवकाने वस्ताद लहुजी साळवे यांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी व भविष्यामध्ये सर्वच महापुरुषांचे विचार आत्मसात करावेत असे नगराध्यक्ष शेषराव जगताप यांनी पुण्यतिथीनिमित्त युवकांना मोलाचा संदेश दिला. आजची पिढी व्यसनाधीन झालेली आहे या व्यसनातून बाहेर पडून युवकांनी शरीरश्रेष्ठी सांभाळून शरीराचे होणारे नुकसान टाळावे.



**घनसांगवी - जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा ललितजी गांधी यांचा सत्कार करताना भाजपा जैन प्रकोष्ठ घनसावंगी विधानसभा समन्वयक तथा प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र जोगदंड.**

# प्राजक्ता तांगडे यांची महसूल सहाय्यकपदी निवड

पिंपळनेर / प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर परिसरात असलेल्या बोरदेवी येथील शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे हिची नुकतीच महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. तीच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने महसूल सहाय्यक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे या मुलीने घवघवीत यश संपादन केले.या यशाने बोरदेवी ग्रामस्थ व कुटुंबातील नातेवाईकांनी आनंद उत्सव साजरा केला. यावेळी प्राजक्ता तांगडे हिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



यावेळी भानुदास तांगडे, सुधाकर तांगडे, परमेश्वर तांगडे, रामेश्वर तांगडे, सिद्धार्थ कांबळे, राहुल कांबळे, सचिन कांबळे, दिलीप आर्सुळ, बारीक आर्सुळ, अशोक घुगे,आर.पी.आय तालुका अध्यक्ष किशन तांगडे, सिद्धार्थ वाघमारे, आनंद मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे नेते परमेश्वर सातपुते ,ऋषिकेश गिरी, पासायदा सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे आणि रंजना दराडे, माजी सरपंच नागेश शिंदे, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, अशोक भांगे सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

बीड (प्रतिनिधी):- येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ अंतर्गत शुभेच्छा आणि गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण कार्यक्रम आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल यांच्या अध्यक्षतेखाली सचिव ॲड. व्ही.बी. मगर सर्व संचालक माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, लक्ष्मणराव शिंदे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या विद्यालयाचे विद्यार्थी आरती नाखाते, तृप्ती खंडाळे, कुंदन झीने, तेजस कांबळे, रितेश जाधव, अवधूत चौरे, सुमित गाडे तसेच, यु.बी.पवळ, आर.बी.घुले आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख यांनी मनोगत प्रगट केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.एस धुतालमल,



मुख्य अतिथी ॲड.व्ही.बी. मगर, माजी मुख्याध्यापक व्ही.जी.आवाड, मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

याप्रसंगी रेखाकला परीक्षा स्पर्धेतील आणि सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात येऊन शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक डब्ल्यू. एस.वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांनी खुर्च्यांचा संच विद्यालयास सप्रेम भेट दिला. या कार्यक्रमाचे संचालन संतोष मेश्राम, प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.ए.हावळे आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. यावेळी आनंद छात्रालयाचे अधीक्षक खरसाडे, समर्थ गुरुकुलचे अधीक्षक रविराज घुले, सर्वश्री आर.बी.घुले, श्रीमती एन.जी.मुंडे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी डीजी हजारे एलबी हजारे सुभाष गायकवाड भारत कोळेकर बहुसंख्य विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## बिंदुसरा नदी प्रदुषण व अतिक्रमण मुक्त करा मागणीसाठी

# बिंदुसरा नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे.बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकाम तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत कचरा टाकणे तसेच जैविक कचरा यामुळे नदीचे प्रदुषण होत असुन बीडकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. बिंदुसरा नदीच्या प्रदूषणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड




जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी बिंदुसरा नदीवरील दगडी पुल नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री, वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितजी पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी रामनाथ खोड, शेख युनुस, जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे,शेख मुबीन आदी सहभागी होते.



**बीड /प्रतिनिधी**
**बीड तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता. जि. बीड संचलित खांडे पारगाव हायस्कूल खांडे पारगाव विद्यालयात डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा वाढदिवस शाळेमध्ये वृक्षारोपण तसेच विविध स्पर्धा ज्यामध्ये हस्ताक्षर, निबंध व प्रश्नमंजुषा इत्यादींच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.ङ्गविजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच सर्वांनी संस्थेचे अध्यक्ष यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

# महावितरणच्या मुख्य अभियंतापदी अरविंद बुलबुले रुजू

## शंभर टक्के वीजबील वसुलीसह ग्राहकाभिमूख सेवेला देणार प्राधान्य

लातूर /प्रतिनिधी

महावितरणच्या लातूर परिमंडलाच्या मुख्य अभियंता पदाचा पदभार श्री अरविंद बुलबुले यांनी काल (दि.१७) स्विकारला. यापुर्वी रास्तापेठ मंडल कार्यालय, पुणे येथे अधीक्षक अभियंतापदी कार्यरत होते.



श्री. बुलबुले हे मराठवाड्याचे सुपूत्र असून १९९९ मध्ये तत्कालीन विद्युत मंडळात सहाय्यक अभियंता म्हणून अहमदनगरच्या ग्रामीण उपविभाग (अहिल्यानगर) येथे रुजू झाले होते. महावितरणमधील २५ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी सहाय्यक अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच अक्षीक्षक अभियंता अशा विविध पदांवर अहमदनगर, हिंगोली, परभणी, सांघिक कार्यालय मुंबई, लोड डिस्पॅच सेंटर कळवा, ठाणे मंडल व रास्तापेठ मंडल पुणे या ठिकाणी प्रभावशाली व उल्लेखनीय काम केलेले आहे. नुकतीच त्यांची मुख्यअभियंतापदी पदोन्नती होऊन लातूर परिमंडलात नियुक्ती झाली आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील क्षेत्रीय अनुभव त्यांच्या पाठिशी आहे. मनमिळावू व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांना ओळखले जाते. महावितरण कंपनीच्या आर्थिक स्थैर्यासाठी विकलेल्या विजेचे संपुर्ण वीजबील दरमहा वसुल झाले पाहिजे. त्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शंभर टक्के कार्यक्षमतेने काम करायला हवे. एक टीम म्हणून काम करत असताना कुटूंब प्रमुख या नात्याने मी तुम्हाला कुठल्याही अडचणी येवू देणार नाही याची खात्री बाळगुन सुरळीत वीजपुरवठा व ग्राहकाभिमुख सेवा देण्यास प्राधान्य द्यावे, असे श्री. अरविंद बुलबुले म्हणाले. त्याचबरोबर सांघिक कार्यालयाने नेमून दिलेल्या विहीत वेळेतच आपणावर सोपवलेली कामे पुर्ण करावीत. वीजग्राहकांनीही आपले वीजबील नियमीत व वेळेवर भरावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

# शिवजयंती महोत्सवानिमित्त भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन



## श्री क्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी येथून निघणार ऐतिहासिक मोटरसायकल रॅली

बीड /प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र दत्त संस्थान, कोल्हारवाडी येथे भव्यदिव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली श्रीहरी महाराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व आदित्य दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली दत्त मंदिर संस्थान येथून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघणार आहे.

ही रॅली दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता श्री क्षेत्र दत्त संस्थान, कोल्हारवाडी फाटा, बार्शी रोड, बीड येथून सुरू होणार आहे. शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या मोटरसायकल रॅलीचे श्री ह. भ. प. श्रीहरी महाराज पवार यांच्या आशीर्वादाने व आदित्य दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली नियोजन करण्यात आले आहे.

ही रॅली शिवभक्तांसाठी एक प्रेरणादायी सोहळा ठरणार असून, शिवरायांच्या न्यायप्रियतेचा, पराक्रमाचा व लोककल्याणकारी विचारांचा जागर करण्याचा संकल्प यानिमित्त करण्यात येणार आहे.

# आज जवळा फकीर येथे पहिली बौद्ध धम्म परिषद - भदंत पय्यातीस महाथेरो

बीड /प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे आज दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे.

या धम्म परिषदेचे उद्घाटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे



कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस सुरुवात होणार आहे. धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो, डॉ. भदंत इंदवंस महाथेरो, विपस्सनाचार्य भदन्त पय्यारत्न थेरो, भदन्त पय्याबोधी थेरो, भदन्त मुदितानंद थेरो, भदन्त ज्ञानरक्षित थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो, भदन्त पय्याशील थेरो, भिक्खू धम्माल थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू संघरत्न, भदन्त धम्मघोष यांची धम्मदेसना होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रकाश दादा सोळंके, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे, प्रा. प्रदीप रोडे, राजेंद्र कांबळे, प्रकाशजी कोकाटे, भाई कीर्तीकुमार बुरांडे, जवळा फकीरचे सरपंच त्र्यंबक साबळे, माजी सरपंच सुनीता मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेस धम्म बांधवांनी व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भदन्त पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे.

# अंथरवण पिंपरी आश्रम शाळेत राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

बीड /प्रतिनिधी

बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा तथा दीनानाथ बालक आश्रमाच्या प्रांगणात राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांची जयंती विविध कार्यक्रमासह साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशीलभाऊ पवार हे होते. यावेळी मुख्याध्यापक शिंदे सर, भूषण पवार, परमेश्वर जाधव, सचिन पवार, सुशांत पवार, पर्यवेक्षक जवरे सर, ज्येष्ठ शिक्षक पैठणे सर, तांड्यातील पांडुरंग पवार, बळीराम पवार, पोमा महाराज उपस्थित होते.

याप्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. अनेक विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. व्यासपीठावरील मान्यवरांनी सेवालाल महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन निर्व्यसनी राहून आई-वडिलांचे व स्वतःचे स्वप्न साकार करून देश सेवा करावी. याप्रसंगी सुशील भाऊ पवार म्हणाले की, संत सेवालाल महाराजांनी दाखविलेल्या मार्गावर जर विद्यार्थ्यांनी वाटचाल केली तर जीवन यशस्वी होईल.याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. या



कार्यक्रमाची तयारी श्रीमती खंदारे मॅडम यांनी घेतली. यावेळी पवार व्ही.एन., शिंदे व्ही.एन. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे साक्षी, पांढरे वैष्णवी यांनी तर आभार प्रा. आखाडे सर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तांड्यातील ग्रामस्थ ही यावेळी उपस्थित होते. सर्व निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रसाद देण्यात आला त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# भारतीय विर किसान पार्टी करणार पुनर्बांधणी - अध्यक्ष गुलाबराव गवळी

जाफराबाद /प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आटोपताच आता ग्रामीण भागातील पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे वेध लागले आहे. विधानसभा निवडणुकीत पक्षाचे इमानेइतबारे काम केल्याचा मोबदला म्हणून अनेक कार्यकर्त्यांना आता जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य होण्याचे स्वप्न पडू लागले असून त्या त्या इच्छुकांनी तशी फिल्डिंग आतापासूनच लावायला सुरुवात केली आहे.

तसेही अद्याप या निवडणुकीची घोषणा झाली नसली तरी राज्यातील एकूणच राजकीय वातावरण पाहता लवकरच घोषणा होण्याची शक्यता कार्यकर्त्यांना वाटत आहे. त्यामुळे भारतीय वीर किसान पार्टीचे संस्थापक अध्यक्ष गुलाबराव गवळी तसेच पदाधिकारी कार्यकर्ते पार्टी



पक्षाचे संघटन, सदस्य नोंदणी, विविधपद देणे यासह पक्षाच्या पुनर्बांधणीच्या कामाला लागले असून कार्यकर्ते पक्ष वाढीसाठी अहोरात्र परिश्रम घेत असल्याची माहिती अध्यक्ष गवळी यांनी दिली.

ते म्हणाले कि भारतीय वीर किसान पार्टी ही शेतकरी,कामगार ,कष्टकरी वंचित महिला तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असून या घटकातील नागरिकांना आता पार्टी सत्तेतही हिस्सा देणार आहे .ईव्हीएम मुळे लोकशाही धोक्यात आलेली असून ईव्हीएम हटवण्यासाठी भविष्यात पक्ष मोठा लढा उभा करणार आहे. यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचेही ते म्हणाले. तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकांच्या राज्यातील सर्वच जागा भारतीय वीर किसान पार्टी ताकतीने लढवणार असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पार्टी सत्ता स्थापन करणार असून विकास काय असतो ते विरोधकांना दाखवून देणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात गाव तिथे पक्षाची शाखा तसेच नवनवीन चेहऱ्यांना निवडणुका लढण्याची संधी देणार आहे.तरी राज्यातील विविध भागातील इच्छुकांनी आपला मतदार संघ, जिल्हा तालुका तसेच संपूर्ण बायोडाट गुलाबराव गवळी संस्थापक अध्यक्ष भारतीय वीर किसान पार्टी मुख्य कार्यालय खापरखेडा गवळी पो.भारज बु.ता. जाफराबाद



**बीड - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी शिवसेनेच्या वतीने छावा चित्रपटाचा मोफत शो तनिष्क टॉकीज , छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सकाळी १०:०० चा शो हा स्क्रीन - २ ला ठेवण्यात आला आहे. अशी माहिती नियोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी दिली आहे.**

# वारकरी संप्रदायातील मधुकर खाडे हे निष्काम कर्मयोगी होते -ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे

## होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

केज /प्रतिनिधी

जो कोणत्याही फळाची किंवा परिणामांची अपेक्षा न करता, निःस्वार्थ, इच्छाशून्यपणे कर्तव्य करतो, त्याला निष्काम कर्मयोगी म्हणतात. वारकरी संप्रदायातील मधुकर महाराज खाडे हे निष्काम कर्मयोगीच होते, असे प्रतिपादन होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे कोद्रीकर यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. गंगापुजनानिमित्त केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव असलेले ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे रविवारी (दि.१६) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते.

अर्जुन महाराज लटपटे म्हणाले की, होळ पंचक्रोशीतील दिवंगत व्यक्तींमध्ये आवर्जून नाव घ्यावे, अशा मंडळींमध्ये मधुकर महाराज खाडे यांचा नामोल्लेख होईल. त्यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारण या क्षेत्रात पूर्ण ताकदीने झोकून दिले. जन्माला आलेला देह आपल्यातून निघून जातो. चांगुलपणाचे मूर्तिमंत व्यक्तीमत्व असलेले मधुकर महाराज खाडे यांचे निधन झाले. ते निष्काम सेवा करणारे होते. भगवंताचे चिंतन करणारे मानवी शरीर स्वर्गात स्थान प्राप्त करते. त्यासाठी जात, कुळ, धर्म याची अट ईश्वराने घातलेली नाही. मधुकर महाराज खाडे हे सेवा करून मोकळे




होत असायचे, त्यांनी कधीही मालक होण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या निष्काम सेवेचे स्मरण रहावे, यासाठी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत समाधी व्हावी अशी अपेक्षा अर्जुन महाराज लटपटे यांनी व्यक्त केली. अलीकडे प्रत्येकाच्या मनात मालक होण्याची भावना असते. सेवा करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे. दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. सेवेतून मानवी शरीर देखील देवरूप होऊ शकते, त्यासाठी तितका भक्तिभाव गरजेचा आहे, तो मधुकर महाराज खाडे यांच्या अंगी होता, असेही अर्जुन महाराज लटपटे म्हणाले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे किर्तन होणार

होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे मंगळवारी (दि.१८) किर्तन होणार आहे. या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिरूरच्या वकील साहित्यिकेच्या काव्यसंग्रहाचे जशोदाबेन यांच्या हस्ते प्रकाशन




मानूर /प्रतिनिधी

शिरूर येथील रहिवासी परंतू संभाजीनगर येथे वकिलीचा व्यवसाय करणाऱ्या साहित्यिका ड.बबिता दिलीप गाडेकर यांच्या हुंदका काव्यसंग्रहाचे प्रकाशन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी ज्येष्ठ साहित्यिक फ.मु.शिंदे यांच्यासह कासार समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद भांडेकर,संदीप चिमटे यांची उपस्थिती होती.बबिता गाडेकर यांनी वकिली व्यवसाय करत असताना कौटुंबिक प्रकरणात पती-पत्नी मधील कलहामुळे महिलांवर आणि त्यांच्या मुलांवर होणाऱ्या परिणामाचे जवळून निरीक्षण केले असून त्यातूनच या काव्यसंग्रहाची निर्मिती झाली असल्याचे गाडेकर यांनी सांगितले. संभाजीनगर येथील ऑरिक सिटीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमासाठी एम.जी.एम,एम.बी.ए अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.सरिता उंबरकर तांडव प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र घडामोडे यांनी पुढाकार घेतला.बबिता गाडेकर यांच्या काव्यसंग्रहासाठी शिरूरचे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्यासह माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील गाडेकर,नगरसेवक गणेश भांडेकर,सुभाष गाडेकर,अर्जुन गाडेकर,सुनील पाटील,दिनेश गाडेकर,बापुराव गाडेकर,नंदलाल गाडेकर,आदर्श शिक्षक नितीन गाडेकर,पत्रकार बांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोलीस चौकी शहागड येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

शहागड /प्रतिनिधी

आगामी येणारे सन व उत्सव निमीत्ताने दि.१६ फेब्रुवारी रोजी पोलीस चौकी शहागड येथे शांतता कमिटीचे आयोजन करण्यात आले होते. या शांतता मिटीच्या बैठकीत शहागड येथे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अश्फाकशहा उपसरपंच अरबाज तांबोळी शोहेब सय्यद नजीर शहा एक बाल बागवान इम्रान पठाण डोमलगाव चे पोलीस पाटील इंद्रजीत खरात विलास मस्के असलम बागवान पोलीस प्रशासन व परीसरातील प्रतिष्ठित नागरिक व पोलीस पाटील व इतर महत्त्वाचे पदाधिकारी हजर होते.



शांतता कमिटीच्या बैठकीत पोलीस अधीक्षक खांडेकर पोलिस उप निरीक्षक इस्माईल शेख पोलिस ऊप निरीक्षक राऊत पोलिस शाकीर सिद्दिकीयांनी आगामी काळात येणाऱ्या सन उत्सव जयंती दरम्यान शांतता राखून साजरा करण्याचे आवाहन केले.विनाकारण कोणीही वाद घातल्यास त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. त्यासाठी पोलीस प्रशासन संपूर्ण तयारी निशी असेल असे पोलीस अधीक्षक आशिष खांडेकर यांनी बोलताना सांगितले. शांतता कमिटीच्या बैठकीत उप विभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे, आदींची उपस्थित होते.

# जिल्हापरिषद प्रशालेचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात साजरे

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील भालगाव नं १ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात आनंदी वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी युसुफ वडगांव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री.चोपणे तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.धनंजय गुजर,माजी सरपंच युवराज ढोबळे हे उपस्थित होते.

स्नेहसंमेलन कार्यक्रमाची सुरुवात गणपती गीतांनी झाली तर आस्ते कदम, भारुड,स्कूल चले हम, नन्ना मुन्ना राही हु,बेटी हिंदुस्तान की,ईदमुबारक, मेरी प्यारी माँ,गोंधळअशा वेगवेगळ्या गाण्यांवर बहारदार नृत्य सादर करत बाल कलाकारांनी गावकऱ्यांची मनेजिंकली यावेळी गावकरी मंडळी





मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विलास राऊत,श्याम मोरे, अजित मोरे,सुनील मोरे, खंडू विभुते,गणेश हंडीबाग,अंकुश विभुते, विशाल विभुते,जलील शेख वकील यांच्यासह गावातील नागरिकमहिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन दहिभाते मॅडम, बावस्कर मॅडम, मुख्याध्यापक अजय काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन फहरत बाजी व अमतुलबाजी यांनी केले.

# बीडमध्ये चार महिण्यां पासून कंत्राटी कर्मचारी नियुक्तीच्या प्रतीक्षेत

## न्यायासाठी पालकमंत्री अजितदादा पवार यांना साकडे

केज/प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामकाजासाठी विविध पदांची भरती केली जाते. यात ऐ.पी.ओ,पी.टि.ओ व सी.डी.ई.ओ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. ग्रामीण भागात रोजगार मिळवून देण्यासाठी या योजनेचा महत्वाचा वाटा आहे.पाणी प्रश्नावर काम करत असताना उन्हाळ्या तील बरीचशी कामे पुर्ण करण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे.सध्या बीड जिल्ह्यात शेतकऱ्यां मार्फत सिंचन विहीर, विहीरपुर्णभरण,जलतारा, शेततळे ईत्यादी कामांची मागणी होत आहे.सध्या ही कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी कार्यरत असलेले कर्मचारी मनुष्यबळ यासाठी अपुरे पडताना दिसत आहे.दि.२७/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुद्येय पदांच्या संख्ये नुसार बीड




जिल्ह्यात एकूण २३९ पदांची आवश्यकता असताना आज रोजी फक्त १७६ पदेच भरली आहेत.बीड जिल्ह्यामध्ये ६३ जागा अजूनही रिक्त असून त्या पैकी फक्त ४७ जागासाठी दि.१३/१०/२०२४ पर्यंत कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले होते.सदरील उपलब्ध करून देण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अजूनही नियुक्त्या दिलेल्यानाहीत. यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामांचा ताण वाढत चालला आहे. परिणामी कर्मचाऱ्यां अभावी बीड जिल्ह्याची म.ग्रा.रो.ह.यो योजनेत वेळेत काम करण्याची गुणवत्ता महाराष्ट्रात सर्वात खाली गेली आहे. पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरील म.ग्रा.रो.ह.यो योजनेत शेतकऱ्यांची कामे पुर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसेंदिवस ताटकळत रहावे लागत आहे,यामुळे लाभार्थ्यांनाही वेळेत मजुरी उपलब्ध होण्यास सध्या विलंब होत आहे. कर्मचाऱ्यां अभावी शेतकऱ्यांना व मजुरांना अशा होणाऱ्या नाहक त्रासाला नाईलाजाने सामोरे जावे लागत आहे.

सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नियुक्त्याबाबत विचारणा केली असता बीड जिल्ह्याचे प्रशासन सकारात्मक असूनही चार महिन्यांपासून कंत्राटी कर्मचारी यांना मिळणारे तुटपुंजे मासिक वेतनही नियुक्ती अभावी मिळत नाही करिता परिवाराचा आर्थिक बोजा कंत्राटी कर्मचाऱ्यांवर वाढतच चालला आहे.करिता बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी चार महिन्यांपासून रखडलेल्या नियुक्त्याकडे लक्ष घालून कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी भावना सर्वत्र कंत्राटी कर्मचाऱ्यात व्यक्त होत आहे.

# पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात इ.१०वी वर्गाचा शुभेच्छा समारंभ संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या इ.१०वी वर्गाचा 'शुभेच्छा समारंभ' दि.१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार रोजी उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून १०वी प्रमुख विष्णू तेलंगे उपस्थित होते.सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर आणि देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी विद्यार्थी मनोगतात इ.१०वीतील कु.सुप्रिया साळवे,अक्षता थोरात,अक्षता साळुंके,प्रिया वाघमारे,प्रीती सोळंके,निशिगंधा निकम,चि. विश्वजित निकम,सलमान शेख,साजिद शेख,गजानन पांचाळ,प्रणव वाघमारे,ओमकार कल्याणी यांनी विद्यार्थी जीवनातील एक टप्पा पूर्ण केल्याचा आनंद आणि या



काळातील विविध क्षणांना पारखं झालो याचे दुःख व्यक्त केले.तसेच कु.वैष्णवी गुळवे हिने सादर केलेल्या 'का कळेना अशी हरवली पाखरे' या गीताने सर्वांना याप्रसंगी अंतर्मुख केले.शिक्षक मनोगतात ज्ञानेश मातेकर यांनी आपल्या मनातील विद्यार्थ्यांच्या हृदय आठवणींना उजाळा दिला.प्रमुख मार्गदर्शक तेलंगे यांनी१०वी नंतर पुढे काय? याबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना म्हणाले की,नव्या युगात झेप घेताना प्रत्येकाला 'स्व' ची ओळख करून घेणे महत्त्वाचे आहे.भविष्याचा वेध घेताना ध्येय प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये ध्यास,नियोजन,योग, स्वाध्याय इ.मूल्यांची रुजवणूक करून घेणे आवश्यक आहे असे विचार मांडून त्यांनी सर्वांना पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच१०वी वर्गाचा निकाल उंचावण्यासाठी शाळेच्या वतीने करण्यात आलेले विविध प्रयत्न याचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन करताना संजयराव विभूते यांनी शाळेने दिलेल्या संस्काररूपी शिदोरीच्या आधारे विद्यार्थ्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करावी.तसेच पुढील परीक्षेला सर्वांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे असे आवाहन केले.सर्व १०वीच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या निधीतून शाळेप्रती ऋण व्यक्त करत विद्यालयास शालेय कामकाजासाठी मोठा टेबल भेट दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर,वैयक्तिक पद्य कु.नेहा वाघमारे ,प्रास्ताविक व परिचय नितीन चौधरी तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने करण्यात आली.




# पाटोदा शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वाढदिवस उत्साहात साजरा

## चिमुकल्यांनी व्हिडिओ कॉल वर संवाद साधत दिल्या शुभेच्छा

पाटोदा प्रतिनिधी,बीड जिल्ह्याच्या भाजपच्या नेत्या माजी खासदार डॉ प्रितमताई मुंडे ताईसाहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज केंद्रीय प्राथमिक शाळा जिल्हा परिषद पाटोदा येथे भाजपचे जिल्हा सरचिटणीस अँड सुधीर घुमरे यांच्या आयोजनाखाली शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दिव्य मराठीचे पाटोदा तालुक्यातील नामांकित पत्रकार अँड महेश बेदरे थेरला येथील सामाजिक कार्यकर्ते चंदू दुधाळ जवळाला येथील माजी उपसरपंच प्रवीण देवडे तसेच मुख्याध्यापिका राऊत मॅडम , या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिद्ध साहित्यिक निवेदनकार सुरेखाताई खेडकर यांच्या सह जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक वर्ग यांची उपस्थिती होती. त्यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ऍडव्होकेट सुधीर भुमरे ने आपले मनोगत व्यक्त करताना खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांनी गेली दहा वर्ष जिल्ह्याचे खासदार म्हणून काम करत असताना बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न नगर परळी रेल्वे मार्गाची काम त्यांच्या कारकिर्दीमध्ये भरघोस असा निधी केंद्र सरकारकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी रेल्वे प्रशासन यांच्याकडून खेचून आणत हे बीड जिल्हा वाशियांची स्वप्नपूर्ती कडे वाटचाल होताना आज नगर वरून बीड पर्यंत रेल्वे धावली आहे यात प्रीतम ताई यांचा सिंहाचा वाटा आहे तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव रेल्वे कृती समिती यांच्या देखील लढ्याचे यश आहे असे अँड सुधीर घुमरे मरे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच आपण दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील कुठलाही खंड न पडु देता सातत्य ठेवत प्रीतम ताई च्या वाढदिवसानिमित्त सामाजिक शालेय साहित्य वाटपासारखे उपक्रम यापुढेही राबवणार असल्याचा संकल्प केला, यावेळी पत्रकार महेश बेदरे यांनी देखील यावेळी प्रियतताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, शालेय विद्यार्थिनी प्रीतम ताई यांना भरभरून व्हिडिओ कॉल करून बर्थडे साँग म्हणत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# ज्ञानदीप क्लासेस व लिटल स्टार इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन संपन्न



नेकनूर (प्रतिनिधी)

शैक्षणिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी नावाजलेल्या ज्ञानदीप कोचिंग क्लासेस व लिटल स्टार इंग्लिश स्कूलमध्ये काल मोठ्या आनंदात आणि उत्साहात स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक बंकट स्वामी संस्थानचे मठाधिपती ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे तर अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य जे एम पैठणे व प्रमुख उपस्थितीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नारायण बप्पा शिंदे , माजी जि प सदस्य भारत बप्पा काळे व नेकनूर पोलीस स्टेशनचे स.पो.नी. चंद्रकांत गोसावी व क्लासेसचे संचालक तुळजीराम शिंदे सर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्धाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उद्धाटन लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. यावेळी आशीर्वाद देताना सांगितले की, माणसाच्या आयुष्यामध्ये धनसंपत्ती महत्त्वाची नसून ज्ञान हे महत्त्वाचे आहे. धन किंवा संपत्ती माणसाला प्रत्येक ठिकाणी उपयोगी येत नाही तर ज्ञानच कायम उपयोगी पडते.

त्याचबरोबर नारायण बप्पा शिंदे यांनी क्लासेस व इंग्लिश स्कूलच्या भरभराटी बद्दल बोलताना पुढे सांगितले की, बालाघाटावरील अनेक यशस्वी विद्यार्थी घडवणारा क्लास म्हणजे ज्ञानदीप कोचिंग क्लासेस होय. भारत बाप्पा काळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व कायम क्लासेसच्या नवनवीन उपक्रमांना माझेही पाठबळ असेल असेही यावेळी सांगितले.

अध्यक्षीय भाषणामध्ये माजी प्राचार्य पैठणे सर यांनी सांगितले की ज्ञानदीप हा फक्त क्लास नसून हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी एक शाळाच आहे कारण शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जेवढे उपक्रम राबवले जातात तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा क्लास म्हणजे ज्ञानदीप कोचिंग क्लासेस असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी इतरही मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये ह भ प प्रा. नाना महाराज कदम,नेकनूर चे सरपंच सुंदर लांडगे, उपसरपंच सचिन शिंदे, नेकनुरचे पी.एस.आय. रोकडे, माजी सरपंच राजा भैय्या, ग्रामीण विद्यालयाच्या प्राचार्या कलिका कदम मॅडम, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी शिंदे, जयदीप काळे, मुकुंद काळे, सय्यद बबलू, जितेंद्र होमकर, बाळकृष्ण खारके, पत्रकार सुरेश रोकडे, अमजद पठाण, ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार अशोक शिंदे, प्रा. मुजावर सर, प्रा. जावेद सर, करांडे सर, वाणी सर,दत्ता वायबट, सखाराम शिंदे सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये अगदी प्री प्रायमरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये चित्रपटातील हिंदी, मराठी गीते, भावगीते, भक्ती गीते, लावण्या,राईम्स सह गायन, नाटक इत्यादी कला विद्यार्थ्यांनी सादर केल्या.



## केज येथे मुकबधीर व मतिमंद विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ देऊन मा.खा.प्रीतमताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा

केज/प्रतिनिधी

केज तालुका भाजपाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी बीड जिल्ह्याच्या माजी लोकप्रिय खा.प्रीतमताई मुंडे यांचा वाढदिवस जाहिरात व बॅनरबाजी न करता सामाजिक उपक्रम घेऊन मतिमंद व मुक बधीर निवासी विद्यालय उमरी येथील विद्यालया तील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ देऊन साजरा करण्यात आला. या वेळी विविध स्पर्धेत सहभाग घेऊन विशेष प्राविण्य मिळवलेल्या मतिमंद व मुकबधीर विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरा वर,जिल्हा स्तरावर व विभागीय स्तरावर वेग वेगळ्या स्पर्धेत सहभागी करून त्यांना संधी उपलब्ध करून दिली. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून योग्य मार्गदर्शन केले.त्याबद्दल संबंधित शिक्षकांचे अभिनंदन केले या कार्यक्रमास भाजपाचे जेष्ठ नेते सुनील आबा गलांडे,उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर,तालुका अध्यक्ष भगवान केदार, रमाकांत बापू मुंडे, व्यापारी महासंघाचे महादेव सूर्यवंशी,डॉ. धनराज पवार,सरपंच महादेव जाधवर,उप सरपंच धीरज वनवे, प्रकाश मुंडे व लक्ष्मण चौरे व जनार्थ शिक्षक मंडळ यांच्या मुख्याध्यपिका श्रीमती जाधव मॅडम,अशोक सुरवसे सर,विशाल कदम सर,

## युवा नेते राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

आष्टीत गुरुवारी वसंत हंकारे यांचे व्याख्यान तर शुक्रवारी खेळ पैठणीचा कार्यक्रम



आष्टी - (प्रतिनिधी) तालुक्यातील जामगावचे सरपंच तथा युवा नेतृत्व राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी मुला- मुलींच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान तर शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबिर, न्यू होम मिनिस्टर यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राधेश्याम धस मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.

आष्टी तालुक्यातील जामगावचे सरपंच तथा युवा नेतृत्व राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदाही दि. २० फेब्रुवारी गुरुवार रोजी सायंकाळी ७ वाजता आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात आई - वडील, मुल - मुली यांच्या नात्यातील सुंदर व्याख्यान सांगणारे व संपूर्ण कुटुंबांनी एकत्रित येऊन ऐकावे असे प्रेरणादायी प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान होणार आहे. तर शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन राधेश्याम धस मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघळुज मध्ये संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त, पारंपरिक पोशाखात बंजारा समाजाची भव्य रॅली

## विद्यार्थ्यांचा गुणगौरव व बक्षिस वितरण,नेत्र तपासणी, रक्तदान शिबिर विविध स्तुत्य उपक्रम राबवून जयंती उत्साहात साजरी

आष्टी (प्रतिनिधी) तालुक्यातील १३ तांडा येथील बंजारा समाज बांधवांच्या वतीने संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे मोठ्या उत्साहात जल्लोषात विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली धानोरा येथून पारंपरिक पोशाखात बंजारा समाजाच्या भव्य रॅलीचे आयोजन वाघळूज पर्यंत करण्यात आले होते.यामध्ये आष्टी तालुक्यातील १३ तांड्यातील ग्रामस्थ पुरुष,महिला, लहान मुले हजारोच्या संख्येने बंजारा बांधवासह सर्व जाती धर्माचे नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगद्गुरू संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती व सकल १३ तांडा येथील बंजारा समाजाच्या वतीने सकाळी १० वाजता धानोरा ते वाघळूज बंजारा पेहरावात भव्य रॅली काढण्यात आली मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले आणि संत सेवालाल महाराज की जय, असा जयघोष करत रॅलीला प्रारंभ झाला वाघळुज येथील भवानीनगर तांडा येथे रॅलीची सांगता झाली यावेळी आ.सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ.धस म्हणाले की बंजारा समाजाप्रती माझी सेवा आहे. बंजारा समाज प्रामाणिक समाज आहे.



बंजारा समाजातील बरेच लोक ऊसतोडणीसाठी जातात पुढच्या वर्षी पासून ऊसतोडणीसाठी जाऊ देणार नाही त्यांची पूर्ण जबाबदारी मी घेणार आहे तसेच तांडा वस्तीवर जाण्यासाठी रस्ते करून देण्यात येईल व शाळेच्या तीन खोल्या बांधून देतो व समाजातील मुला मुलींनी शिक्षण घेऊन अधिकारी होऊन आई वडिलांचे नाव उज्वल करावे आणि समाजाच्या सर्व समस्या मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन आ सुरेश धस यांनी दिले.कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला सदरील कार्यक्रम पार पाडण्याकरिता सर्व स्तरातील नागरीकांचे योगदान लाभले.या कार्यक्रमासाठी बंजारा समाजातील महिला तसेच पुरुष मंडळीने पारंपारिक पोशाख परिधान करून हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.गावातील सामूहिक रॅली. पारंपारिक वेशभूषेतील बंजारा नृत्य, फॅन्सी ड्रेस,मूर्ती पूजन व भोग भंडारा, बंजारा सांस्कृतिक नृत्य, बंजारा गीतांचा नजराणा,विद्यार्थी गुणगौरव बक्षीस वितरण, भव्य रक्तदान व नेत्र तपासणी शिबिर यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर ठिकाणी १३ तांड्यातील लोकांचे सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. भवानीनगर तांडा, चौकी तांडा, लक्ष्मीनगर, सिंगर मळा, कारखेल, गहूखेल, देऊळ घाट, हरेवाडी, जोमदरा, नागझरी, टेकडवाडी या तांडा वस्तीवरील महिला, पुरूष,बाल गोपाळ, वयोवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमास आ सुरेश धस यांनी भेट दिली असता बंजारा समाजाच्या वतीने बंजारा पोशाख घालून त्यांचे जल्लोषात स्वागत केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश राठोड, नितीन राठोड, नवनाथ राठोड, गणेश पवार, धोंडीराम राठोड, प्रकाश राठोड यांच्यासह बंजारा समाजातील जेष्ठ नागरिक युवक, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## श्री गुरुपादुका मठ चनई च्या वतीने महाशिवरात्री निमित्ताने शिवलिलामृत पारायण सप्ताहाचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- येथील श्री गुरुपादुका मठ(मंदिर) च्या वतीने महाशिवरात्री च्या निमित्ताने शिवलिलामृत या ग्रंथाच्या पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.हे पारायण बुधवार दि.१९/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ पर्यंत असणार आहे.या सप्ताह पारायण काळात त्रिकाळ आरती स.७,दु.१२.सायं.६ वाजता असणार आहे.याशिवाय या सप्ताह काळात रूद्र याग व केदारनाथ महाराजांना रूद्राभिषेक होणार असणार आहेत.

ज्यांच्याकडे ग्रंथ उपलब्ध नसेल त्यांना ग्रंथ तिथे उपलब्ध करून देण्यात येईल.हे पारायण श्री गुरुपादुका मठ (मंदिर), सिध्दीविनायक कॉलनी,चनई येथे होणार असून या सेवेत जास्तीत जास्त सेवेक-यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मठाच्या परमपूज्य गुरूवर्य श्री.समीर(दादा) भास्करे, प्रवीण बासटवार,शिंदे काका,पंडीत काका, अनिकेत पवार,गोपाल खांडेकर,रोहन गडदे श्रध्दा भास्करे,संगीता सौदागर,मिना कदम,जान्हवी पतंगे,सिता गडदे, यांनी केले आहे.

## राक्षसभुवन येथील कॅनॉलची दुरुस्ती करून पाणी सोडण्याची मागणी

शिरूर /प्रतिनिधी

तालुक्यातील राक्षसभुवन येथील कॅनॉलची दुरुस्ती करून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी सोडण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी सिंदफणा मध्यम प्रकल्पाच्या शाखा अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या संदर्भात सदरील शेतकऱ्यांनी ६ फेब्रुवारी रोजी विनंती अर्ज केला असून त्या अर्जाची दखल घेण्यात आली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.तरी सदरील निवेदन दिल्यानंतर १७ फेब्रुवारी पर्यंत आम्हाला आमच्या चारीमध्ये पाणी उपलब्ध करून द्यावे अन्यथा १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता राक्षसभुवन येथील चार दारे या ठिकाणी पाटाच्या पाण्यात बसून अर्धनग्न बसून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा हनुमत तांबे,प्रमोद निकम,काकासाहेब तांबे,रघुनाथ कोठुळे,भाऊसाहेब तांबे,धर्मा खोले,आबासाहेब खोले,पांडुरंग खोले,पांडुरंग खोले,कल्याण तांबे आदी शेतकऱ्यांनी दिला आहे.

## महाशिवरात्री व राष्ट्रसंत संताजी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त संगीत शिव महापुराण.

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील आराध्य दैवत असलेल्या श्री भामेश्वर मंदीरात दरवर्षी प्रमाणे यंदाही महाशिवरात्री महोत्सव व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव या संयुक्त महोत्सवानिमित्त निमित्त दि.२० फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान संगीत शिव महापुराण कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध कथाकार व युवा किर्तनकार ह.भ.प.प्रा.सौ.संगीताताई पूर्णे (परभणीकर) यांच्या रसाळ वाणीतून संगीत शिव महापुराण कथेचे निरूपण करणार आहेत. दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत ही कथा भामेश्वर मंदिर येथे होईल. तसेच दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त संत मीराबाई आईसाहेब संस्थानच्या मठाधिपती ह.भ.प.राधाताई महाराज यांचे रात्री १० ते १२ कीर्तन होईल. दिनांक २७ फेब्रुवारी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. संगीताताई पुर्णे यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून श्री. शंभू महादेव व राष्ट्रसंत संताजी महाराज जगनाडे यांच्या प्रतिमेची मिरवणूक सवाद्य , टाळ मृदुंगाच्या गजरात निघणार असून भाविकांनी यात सहभागी व्हावे ,मिरवणूक भामेश्र्वर मंदिरात आल्यानंतर विठ्ठल रुख्मिणी संस्थांनचे मठाधिपती ह.भ.प. सतीष महाराज उरणकर यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे भगवान हरिभाऊ मुळे यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या सर्व भक्तीरसाचा पंच क्रोशितील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री भामेश्र्वर मित्रमंडळ व राष्ट्रसंत संताजी युवक मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ विडा शाखा क्रमांक नऊ आयोजित ढकली हॉलीबॉल स्पर्धेत खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

## छत्रपती शिवाजी महाराज व माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य

केज/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज व माता रमाबाईआंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज कला क्रिडा व सांस्कृतिकमंडळ चिंचवडगाव शाखा-विडा यांच्या वतिने आयोजित करण्यात आलेल्याढकली हॉलीबॉल स्पर्धेत विविध जिल्ह्यांतून खेळाडूंच्या तब्बल वीस टिमसहभागी झाल्या होत्या.स्पर्धेच्या सांगतेला विजयी टिमला रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन संयोजकांच्या वतिने सन्मानित करण्यात आले

केज तालुक्यातील विडा येथे छत्रपती शिवाजी महाराज व माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती च्या निमित्ताने राज कला क्रिडा व सांस्कृतिकमंडळ चिंचवडगाव शाखा -विडा यांच्या वतिने दोनदिवसीय ढकली हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचा शुभारंभकरण्यात आला.त्यानंतर विविध जिल्ह्यांतून आलेल्या क्रिडा क्षेत्रातील खेळाडूंनी ढकली हॉलीबॉल स्पर्धेत सहभाग नोंदवत स्पर्धेला प्रचंड रंगत आणली होती. स्पर्धेत धाराशिव येथिल टीमने प्रथम क्रमांक पटकावला असून अरविंद गलांडे यांच्या वतिने २१००० हजार रूपयांचे रोख बक्षिस पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तर येडशी येथिल टीमने दुसरा क्रमांक पटकावला असून अनिल ढोबळे यांच्या वतिने १६७५० रूपयांचे रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.तर जालना येथील टीमने तृतीय क्रमांक पटकावला असून सिताराम सरवदे यांच्या वतिने ११००० रूपयांचे रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.तसेच माळेगांवच्या टिमने चौथा क्रमांक पटकावल्याबद्दल दिपक वाघमारे यांच्या वतिने ८००० रूपये रोख बक्षिसांसह पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच रवि दादा अंधारे ६०००,अरूण सत्वधर ५०००,अमोल ढोबळे ४७५०,नारायण वाघमारे २१००,आकाश वाघमारे १५००,रिजवान खुरेशी १००० यांच्या वतिने स्पर्धे तील विजेत्या खेळाडूंना उत्स्फुर्तपणे बक्षिसे देण्यात आले आहेत.




तसेच दीपक वाघमारे, अनिल ढोबळे,सीताराम सरवदे,मंगेश देशमुख, संकेत शेंडगे,किरण पटाईत,साहिल ढोबळे, प्रसाद पटाईत,राहूल लांडगे,वैभव घूटे व राजा हनूमान हॉलिबॉल संघाने यशस्वीपणे संयोजकांची भूमिका पार पडली आहे.

## धनंजय मुंडेंचा राजीनामा कधी? चंद्रकांत पाटलांनी थेट हात जोडले:स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीविषयी महत्त्वाची माहिती

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय मानला जाणारा वाल्मीक कराड याला अटक करण्यात आली आहे. मात्र या प्रकरणावरून राज्यात धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणी होत आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनामा साठी प्रचंड दबाव असला तरी राज्य सरकारच्या वतीने त्यांचा राजीनामा घेण्यास स्पष्ट नकार देण्यात येत आहे. यातच मंत्रिमंडळातील इतर सहकारी देखील याविषयी जास्त बोलण्यास तयार नाहीत. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांना देखील या संदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारला होता. मात्र, चंद्रकांत पाटील यांनी पत्रकारांना हात जोडत याविषयी बोलण्यास नकार दिला आहे.

भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांना प्रसारमाध्यमांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी प्रश्न विचारला होता. मात्र यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता चंद्रकांत पाटील यांनी हात जोडून पुढे जाणे पसंत केले. त्यामुळे आता या प्रकरणाची चर्चा चांगलीच रंगली आहे. मंत्री चंद्रकांत पाटील हे पंढरपूरमध्ये आले असता त्यांनी भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी पत्रकारांनी चंद्रकांत पाटील यांना प्रश्न विचारले होते. मात्र, त्यांनी उत्तर दिले नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीविषयी महत्त्वाची माहिती

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये महायुती एकत्र लढणार की, सर्व पक्ष स्वबळावर लढणार याबाबत सध्या राज्यात संभ्रम निर्माण झाला आहे. अनेक नेते स्वबळाची भाषा करत आहेत. तर काहींनी महायुतीच्या माध्यमातूनच निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे सांगितले आहे. या संदर्भात निर्णय राज्य किंवा शहर पातळीवर घेतला जाऊ शकतो. प्रत्येक शहरामध्ये पक्षाची ताकद वेगळी असते. त्यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय होईल. त्यामुळे महायुतीतील कोणत्याच बड्या नेत्यांनी याबाबत वक्तव्य करू नये, या मताचा मी आहे, असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. वक्तव्य करणारे नेते मोठे आहेत, त्यामुळे मी त्यांना काय सल्ला देऊ, असा टोला देखील त्यांनी महायुतीमधील नेत्यांना लगावला आहे.



# प्रितमताई मुंडे : स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व

प्रितमताई मुंडे..... महाराष्ट्राचा राजकीय इतिहास हा स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या बरोबरच डॉ. प्रीतमताई ही अगदी समर्थपणे पुढे चालवत आहेत बीड जिल्ह्याच्या मा. खासदार महाराष्ट्राच्या राजकारणातला एक स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व म्हणून डॉ. प्रितमताई मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. प्रितमताई यांच्या नेतृत्वाकडे पाहिले जात आहे. समाजातील वंचित, पीडित घटकांच्या सेवेसाठी आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास घेत, उद्यमशील वृत्तीने प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी, धुरंदर नेतृत्व आज सर्वसामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे.असे म्हणतात की, जे वसे मनी, ते दिसे स्वप्नी पण प्रितमताईंच्या बाबतीत जे मनातही नव्हते आणि स्वप्नातही नव्हते ते त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष घडले. वडील लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अकाली निधन झाल्यामुळे त्या अपघाताने राजकारणात आल्या. २०१४ मध्ये वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर बीड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक झाली. या निवडणुकीत डॉ. प्रितमताई मुंडे या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या. त्या ६,९६,३२१ मतांनी जिंकल्या, जो एक राष्ट्रीय विक्रम ठरला. त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ही त्या पुन्हा कर्तुत्व आणि जनतेशी जनसंपर्क आणि जनसेवेच्या भूमिकेमुळे पुन्हा विक्रमी मतांनी खासदार झाल्या. सलग दोन वेळा विक्रमी मताने त्या खासदार होण्याचा मान त्यांनी मिळवला. खासदार झाल्यानंतर त्यांनी वडिलांचे अधुरे आणि जिल्ह्यातील जनतेचे गेल्या पाच दशकांचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार केला. बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा असलेला अहमदनगर - बीड - परळी रेल्वेचा प्रश्न संसदेत अगदी प्रभावीपणे मांडल्यामुळे आणि त्याचा कायम पाठपुरावा केल्याने आज रेल्वे मार्ग पूर्णत्वास जात आहे. त्यामुळे त्यांची बीड जिल्ह्यात 'रेल्वेताई' या नावाने ओळख निर्माण झाली आहे.

सध्या महाराष्ट्राचं राजकारण ज्या दिशेने जात आहे, ते सर्वसामान्य माणसाला खटकणार आहे. अशा स्थितीतही कायम जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये ही त्यांनी केलेली अपेक्षा त्यांच्यात सामान्य माणसाविषयी असलेली तळमळ दाखवून देते. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या संघर्ष, सेवा आणि नेतृत्वाचा वारसा घेऊन बीड जिल्हा आणि महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या कर्तुत्वाने एक वेगळी ओळख त्यांनी निर्माण केली आहे. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्ते आणि समर्थक विविध सामाजिक उपक्रम राबवतात. रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, गरीबांना मदत आणि सामाजिक उपक्रम हे त्यांच्या वाढदिवसाचे वैशिष्ट्य आहे. त्या केवळ राजकारणात नव्हे, तर सामाजिक कार्यातही कायम अग्रस्थानी असतात. त्यांनी आपल्या कार्यकुशल नेतृत्वामुळे लोकांच्या मनात स्थान मिळवले आहे. त्यांचा वाढदिवस म्हणजे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी दिवस असतो. त्या पुढील काळातही समाजहिताचे कार्य अविरत करत राहोत, हीच शुभेच्छा! डॉ. प्रितमताई मुंडे यांचे स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व आज सर्वसामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे. आमच्या लाडक्या ताईला वाढदिवसाच्या मनपूर्वक लक्ष - लक्ष शुभेच्छा!!!

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - आ.विजयसिंह पंडित

## वडगाव (चिखली) येथे १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ संपन्न

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामाणिक काम करत भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेती आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

गेवराई तालुक्यातील वडगांव (चिखली) येथे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भव्य शुभारंभ पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रा.काँ.पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव काळे, पं.स.सदस्य परमेश्वर खरात, जयसिंग जाधव, प्रा.मुकुंद काळे, ड.सोमेश्वर काळे, राजेंद्र वारंगे , कृ.उ.बा.स संचालक अशोक खरात , सरपंच मच्छिंद्र ढेरे , संपादक अमोल वैद्य, पत्रकार विनोद पौळ, बाळू वारे, तीर्थराज गवारे, ग्रामसेवक राजेंद्र बन, प्रल्हाद यादव, बापूसाहेब हुंबरे, ग्रा.पं. सदस्य अशोक जाधव सह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की, मतदारसंघातील अनेक गावांत विविध कामे प्रलंबित आहेत. ती विकास कामे आपल्याला मार्गी लावायची आहेत. राज्यात आपलं सरकार आहे. पाच वर्ष हे सरकार आपलं सरकार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजितदादा पवार हे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे पाच वर्षात जास्तीत जास्त निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणून भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला विविध कामे करायची आहेत. शिवछत्र परिवाराबरोबर मायबाप मतदार आणि तरुण कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला मला साथ दिली. मतदारांच्या खूप अपेक्षा आहेत. सर्वांच्या अपेक्षा नक्कीच पुर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहेत. आपण दिलेले




प्रेम हे विसरुन चालणार नाही. हे जे काही ऋण आहे याच्यातनं कधीच उतराई होणार नाही. कारण दहा वर्षापासून शिवछत्र परिवार संघर्ष करतोय आपण ते उद्दिष्ट साध्य केलं ते तुम्ही करुन दाखवलं त्याच्यामुळे याची जाणीव निश्चितपणाने संपूर्ण परिवाराला आहे. तसेच आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि नगरपालिकेच्या निवडणूका होतील यातही शिवछत्र परिवार आपल्या सर्वांच्या सहकार्याने वर्चस्व प्रस्थापित करेल असा विश्वास व्यक्त करुन कार्यकर्त्यांनी यासाठी कामाला लागावे असे आवाहनही शेवटी बोलताना व्यक्त केले.

यावेळी परमेश्वर खरात, भाऊसाहेब नाटकर, मुकुंद काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष औटे, गुलाब औटे, परमेश्वर काळे, माजी सरपंच बबनराव ओटे, नारायण यादव, राजाभाऊ काळे, सुरेश काळे, नकुल औटे, हताम्रध्वज औटे, जिमुरध्वज औटे, श्रीनिवास काळे, महारुद्र काळे, भाऊसाहेब काळे, अशोक काळे, अभिषेक काळे, भारत काळे, महेश औटे, साईनाथ सुरवसे, विष्णू ठोसर, अशोक जाधव, गहणीनाथ शिंदे, अंगद सुपेकर, शिरु वारे, अशोक औटे, बाबूभाई सय्यद, राघू भोसले, प्रल्हाद राऊत, कल्याण धोत्रे, केशव कदम, अण्णासाहेब सुरवसे, देविदास जाधव, अमोल पवार, अमोल पानखडे, अंगद जाधव , रामनाथ यादव, शिवाजी काळे, कालिदास औटे सह चिखली , सुशी, साठेवाडी, कवडगाव येथील ग्रामस्थांसह आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ग्रा.पं.सदस्य वशिष्ट काळे पाटील, बबन काळे, बाळू भोसले, बाबू औटे, सुनील काळे, सतीश काळे, मंगेश काळे, अमर काळे, प्रशांत काळे, भारत काळे,

# पंचशील नगर भीमजयंतीची कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड तर सचिवपदी सुमेध सरवदे यांची निवड





बीड ।प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पंचशील नगरमध्ये भीमजयंतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या आयोजनानिमित्त रविवार (दि.१६) रोजी सायं. बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गेल्या वर्षीच्या जयंतीचा हिशोब देण्यात आला व नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड तर सचिवपदी सुमेध सरवदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

मागील वर्षीचे अध्यक्ष ॲड.तेजस वडमारे व सचिव चेतन पवार यांनी गेल्या वर्षीचा हिशोब देवून पुढील बैठकीस सुरूवात केली. यामध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड, उपाध्यक्ष अशोक जावळे, सचिव सुमेध सरवदे, कार्याध्यक्ष आनंद खेमाडे, सहसचिव सोमेश हिवराळे, कोषाध्यक्षपदी अभय गायसमुद्रे यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षपदी बौद्धाचार्य सदाशिव कांबळे हे होते. तर ॲड.राहुल मस्के, प्रमोद शिंदे, महेंद्र वडमारे, संजय मिसाळ, के.के.वडमारे, विकास डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पंचशील नगरमधील उपासक, उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तुलसी इंग्लिश स्कूलचे चंपावती महोत्सवात यश

प्रतिनिधी । बीड

बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवात तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड. च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाच्या वतीने चित्रकला, समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, समूहगीत गायन, रांगोळी आधी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून सोलो डान्स स्पर्धा (वर्ग १ ली ते ३ गट) मध्ये इयत्ता ३ री मधील विद्यार्थिनी कु. अनघा काळे

प्रथम क्रमांकाने विजेती ठरली, तर जोडी नृत्या मध्ये कु .जान्हवी महांवर आणि कु.भूमी महांवर या द्वितीय क्रमांकाने विजेत्या ठरल्या. वयक्तिक गीतगायन स्पर्धा मध्ये , कु. जान्हवी महानवर हिने द्वितीय क्रमांक



मिळवला,तर पृथ्वीराज पौळ या विद्यार्थ्याने वैयक्तिक नृत्य मध्ये तिसरा क्रमांक मिळविला.त्यांच्या या उत्स्फूर्त यशाबद्दल त्यांच्यासह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शाळेतील सहशिक्षिका स्मिता महानवर व जया ससाणे मॅडम या शिक्षकांचे अभिनंदन, देवगिरी प्रतिष्ठान चे अध्यक्ष आदरणीय प्रा. प्रदीप रोडे सर ,शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर मॅडम व शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकांच्या वतीने करण्यात आले. आपल्या पाल्याच्या घवघवीत यशाबद्दल पालकांनीही आनंद व्यक्त केला.

# खा. बजरंग सोनवणे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची ऍलर्जी आहे का?

## बीड रेल्वे स्थानकाला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी मी दोन वेळेस आमरण उपोषण केले



प्रतिनिधी । बीड

बीड जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी समाजाने या मागणीला पाठिंबा दिला आणि हजारो लोक रस्त्यावर उतरले. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी दिलेले पत्र त्यांच्या फेसबुक अकाउंट वरती टाकले. बार्शी नाक्याला रेल्वे स्टेशनचा थांबा द्या, अर्थात बार्शी नाक्यावरती रेल्वे थांबली पाहिजे या संदर्भातील ते पत्र आहे. बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा करून बार्शी नाक्याला रेल्वे थांबली पाहिजे याची तजवीज केली. यामुळे बार्शी नाक्यावर राहणाऱ्या लोकांमध्ये आनंद पसरला, यासाठी आम्ही खासदारांचे स्वागतच करतो.

परंतु बीड रेल्वे स्टेशनला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी खासदारांनी कोणताही पत्रव्यवहार केंद्रीय रेल्वेमंत्री सोबत केला नाही, आणि जर तसा काही पत्रव्यवहार त्यांनी केला असेल तर त्यांनी तो फेसबुक वरती जाहीर करावा. निवडणुकीमध्ये राजकीय पक्षांना बौद्धांची मते पाहिजे असतात, एकदा निवडणूक झाली की बौद्धांकडे पाठ फिरवायची, ही सवय प्रस्थापित पक्षांना लागलेली आहे. खासदार बजरंग बप्पा सोनवणे याला अपवाद नाहीत.

खासदार साहेबांना आमची नम्र विनंती आहे की, जसा बार्शी नाक्यावरील थांब्याचा तुम्ही पाठपुरावा केला, तसाच पाठपुरावा बीड रेल्वे स्टेशनच्या नावाचा सुद्धा करावा. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी थोडे कष्ट घेऊन आपण केंद्रीय रेल्वेमंत्री सोबत पत्र व्यवहार करावा. जर बाबासाहेबांचे नाव न देताच रेल्वे स्टेशन चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला तर आम्ही बौद्ध बांधव असा कोणताही उद्घाटन सोहळा होऊ देणार नाही, हे खासदार महोदयांनी पक्के लक्षात ठेवावे.

भीमसैनिक
अनुरथ वीर, बीड

# निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी सुरु करण्यात याव्यात

## त्यांना ३ हजार रुपये मानधन देण्यात यावे. डीडीसी अट रद्द करण्यात यावी

प्रतिनिधी । माजलगांव

निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी तात्काळ सुरू करण्यात याव्या त्यांना तीन हजार रुपये मान देण्यात यावे व डीडीसीची जाचक अट तात्काळ रद्द करण्यात यावी यासह विविध मागन्यासाठी सय्यद सलीमबापू(मराठवाडा अध्यक्ष) यांनी आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा संघटनेमार्फत माजलगाव तहसील कार्यालया समोर सोमवार दि.१७ रोजी रास्ता रोको आंदोलन सुरू केले.




यावेळी आंदोलनकर्त्यांनी तहसिल कार्यालय माजलगाव येथील कर्मचारी हे जाणीवपुर्वक संजय गांधी,इंदीरा गांधी,श्रावणबाळ, अर्थसहाय्यता या निराधार लोकांची अडवणुक करीत असल्याचा आरोप केला.निराधारांच्या पगारी वेळेवर वाटप करीत नाहीत.तसेच त्यांना सांगण्यात येते की,तुम्ही आधार लिंक करा,परंतु काही लोकांचे अंगठे येत नाहीत त्याचे काय?असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना केला. निराधारमध्ये अनेक अंधळे, लंगडे, बहिरे,मुके,कुष्ट रोगी,कॅन्सर पेशन्ट, वयस्कर,विधवा इत्यादी लोकांची आपल्या कार्यालयामार्फत वेठीस धरल्या जात आहे.त्यामुळे निराधारांची हेळसांड होत आहे. कर्मचारी त्यांना अपमानास्पद वागणुक देत आहेत.तसेच त्यांची हयातनाम्याच्या नावाखाली अनेक पगारी बंद करण्यात आलेल्या आहेत.पगारी अडवुन ठेवण्यात आलेल्या आहेत.त्यामुळे वरील लोकांना आर्थिक त्रास होत आहे. तसेच दवाखान्याचा इलाज होत नाही.त्यांना खाण्या-पिण्यासाठी अन्न भेटत नाही.त्यामुळे त्यांना जिवन नकोसे झालेले आहे.तसेच आपल्याकडे निराधाराला मंजुर झालेल्या पगारीबाबत मुळ संचिका आहे का?तसेच निराधारांच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किती बैठका झाल्या?व किती पगारी मंजुर करण्यात आल्या?याची माहिती देणे,तसेच किती निराधार मयत झाले याची नोंद आपल्या 'कार्यालयाकडे आहे का?इत्यादी निराधारांच्या अनुषंगाने आवश्यक अशा प्रश्नांना वाचा फोडत सय्यद सलीमबापू यांनी आपल्या कार्यकर्त्यांमार्फत वरील सर्व मागण्या पूर्ण करण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली. ॲड. सय्यद अल्ताफ, , शेख इलियास,मिर्झा महमूद, बाबासाहेब साळवे. समीर सिद्दिकी, शेख महमूद, शेख अंजरभाई, व असंख्य निराधार महिला व पुरुष उपस्थित होते



# बार्टी कडून आद्य क्रांतिवीर लहुजी उस्ताद साळवे पुण्यतिथी दिनी मानवंदना

प्रतिनिधी । वसमत

डॉ .बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे .प्रकल्पाधिकारी सिद्धार्थ गोंवदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे, गुरुनाथ गाडेकर .सर्वप्रथम आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास करण्यात आली.या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी यादव गायकवाड हे होते.क्रांतिकारक लहुजी वस्ताद यांचं आजच्याच दिवशी १८८१ मध्ये निधन झालं होतं. लहुजी साळवे यांचे पूर्णनाव लहु राघोजी साळवे असे होते .त्यांचा जन्म पुरंदर किल्याच्या पायथ्याशी असलेल्या 'पेठ' या गावातील एका मातंग कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहुजी दांडपट्टा, घोडेस्वारी, भालाफेक, मंडूक, तोफागोळा चालवयात पारंगत हाते. त्यांना आरक्रांतीचौर, क्रांतीगुरू, लहुजीबुवा,मांग या नावानेही ओळखले जातात.सूत्रसंचालन अमोल कोरडे यांनी केले यावेळी गोकुळ गायकवाड, प्रेम ढोकणे, किशोर गायकवाड ,मयूर गायकवाड, विजय सूर्यवंशी, गणेश गायकवाड, गोकुळ गायकवाड , बाळू गायकवाड, आभार प्रदर्शन मुन्ना गायकवाड यांनी केले जावळीया संख्येने नागरिक उपस्थित होते.